# NEWS AND EVENTS

विद्यार्थीचे नाव: दाते नीलेश
विभाग/ वर्ग : टी वाय बी ए (इतिहास)
रोल न. 10

## क्षेत्र भेट अहवाल लेखन
## जामगाव भुईकोट किल्ला

[illegible]



[illegible]





[illegible]



[illegible]



**Principal Dr. LS Matkar specially guided the students in the workshop on "Historical Tourism and Employment Opportunities", 25/05/2022**




**Workshop Key Note Addressing Mr. Nawanath Wavhal (One day Worksop, Historical Tourism and Opportunity of Employment)**



पुण्य नगरी

# माणसाच्या मनातील तिरस्कार मानवतेला बाधक : प्रा. मोटे


**टाकळी ढोकेश्वर :** माणसाच्या मनातील दुसऱ्याविषयी असलेला तिरस्कार हा मानवतेला बाधक असल्याचे प्रतिपादन अहमदनगर येथील न्यू आर्टस कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या प्रा.सुनिता मोटे यांनी केले.

श्री ढोकेश्वर महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळांतर्गत ऐतिहासिक पर्यटन व रोजगाराची संधी आणि संत कबीर काव्य की प्रासंगिकता या दोन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रा.मोटे बोलत होत्या. त्यापुढे म्हणाल्या की, शाळा, महाविद्यालयातूनच विद्यार्थ्यांना आपल्या सुप्त गुणांची जाणीव करून देऊन कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमाकडे वळवणे हे शिक्षकांपुढील आव्हान आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लक्ष्मण मतकर हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थी व त्यांच्यापुढील आव्हाने यावर भाष्य केले. वर्गामध्ये जे शिकवले जाते त्याचे उपयोजन केल्याशिवाय प्रगती होत नाही म्हणूनच प्रत्येक कार्यशाळा व नाविन्यपूर्ण उपक्रमात आपण सहभागी व्हावे व स्वतः स्वयंरोजगार निर्माण करावा असे आवाहन त्यांनी केले. कार्यशाळेत प्रा. नवनाथ वाव्हळ यांनी जिल्ह्यातील पर्यटनाची वारसास्थळे व रोजगाराच्या संधी कशा निर्माण होतील यावर चर्चात्मक संवाद साधला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एकनाथ जाधव तर पाहुण्यांचा परिचय प्रा.शुभांगी पवार यांनी केला. सुत्रसंचालन प्रा.प्रकाश गावित यांनी केले तर आभार विद्यार्थी विकास अधिकारी किशोर कांबळे यांनी मानले.

(छाया : गंगाधर धावडे)

Smart Ahmednagar
Page No 2 May 27, 2022

workshop on "Historical Tourism and Employment Opportunities"  News,  27/05/2022




Online Special Guidance Lecture "Role Of Chhatrapati Shivaji Maharaj In Swarajya" by Dr. Pandurang Kand.
22/02/2022



पुण्य नगरी

# शिवचरित्र युवकांसाठी नवनिर्मितीचे शस्त्र : डॉ.कंद

**टाकळी ढोकेश्वर :** शिवचरित्र युवकांसाठी नवनिर्मितीचे शस्त्र असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ. पांडुरंग कंद यांनी केले.

श्री ढोकेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शिवजयंती तसेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या आभासी मंचमध्ये प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. पांडुरंग कंद हे 'छत्रपती शिवाजी महाराज व २१ वे शतक' या विषयावर बोलत होते. मला काय करायचे आहे? मी कोण आहे? याचे उत्तर विद्यार्थ्यांना शिवचरित्रात मिळते, असे सांगून ते पुढे म्हणाले, सोळावे वरीस धोक्याचं नसून नवनिर्मितीचे आहे. शिवरायांनी सोळाव्या वर्षात शपथ घेऊन स्वराज्याचे तोरण बांधले. शिवरायाच्या राज्यकारभाराच्या नीतिमधून आपल्याला पर्यावरण, स्त्री- पुरुष समानता, राजनीती, शेतकऱ्यांचे प्रश्न, जलनीती, कचरा व्यवस्थापन व वीज बचतीचे महत्व इ. दिसून येते. विद्यार्थ्यांनी शिवरायांसारखा व्यापक दृष्टिकोन ठेवल्यास आपल्या राष्ट्राचा विकास होईल. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य मतकर यांनी विद्यार्थ्यांना शिवनीतीचे धडे घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या हिंदी व इतिहास विभागाने केले. सूत्रसंचालन प्रा. प्रकाश गावित यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. एकनाथ जाधव यांनी केला. प्रा. समीर दळवी यांनी आभार मानले.

Smart Ahmednagar
Page No 2 February 27, 2022

Online Special Guidance Lecture "Role Of Chhatrapati Shivaji Maharaj In Swarajya"
News 27/02/2022



**Heritage Walk 4th February 2019**



**Shanta Gadge, Head of Department History, during the celebration and guidance of Subhash Chandra Bose birth anniversary, 23/01/2020**





Historical Tour Visit, at Erola Cave 31/12/2017



Historical Tour Visit, at Raigad Fort 15,16 January 2019



सकाळ नगर

TODAY सकाळ

## मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळेला चांगला प्रतिसाद

टाकळी ढोकेश्वर, ता. १८ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे इतिहास विभागांतर्गत टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर) येथील ढोकेश्वर महाविद्यालयात (ता. १७) रोजी मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा झाली. प्राचार्य वीरेंद्र धनशेट्टी अध्यक्षस्थानी होते.

डॉ. के. एम. अंबाडे, प्रा. नवनाथ फलके, सचिन नगरे उपस्थित होते. अंबाडे म्हणाले, की यादवांच्या काळात राज्यकारभाराच्या सोयीसाठी हेमाडी पंत यांनी या लिपीचा शोध लावला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मात्र परत बाळाजी आवजी चिटणीस यांनी या भाषेचा विकास घडवून आणला. प्रा. फलके यांनी शिवकालीन मोडी, पेशवेकालीन मोडी व ब्रिटिशकालीन मोडी यांची वर्गवारी कशाप्रकारे केली जाते हे सांगितले. सचिन नगरे यांनी मनोगत व्यक्त केले. शांता गडगे यांनी प्रास्ताविक केले. अशोक मोरे यांनी आभार मानले.

टाकळी ढोकेश्वर : ढोकेश्वर महाविद्यालयात मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळेप्रसंगी डॉ. के. एम. अंबाडे, प्राचार्य वीरेंद्र धनशेट्टी, अशोक मोरे.

**Modi Sript Workshop News, 17/01/2017**



**Visited the excavation site near the village of Math Pimpri, Ahmednagar on the banks of river Sina. Meanwhile, students and professors while discussing with Dr. PD Sable.(Deccan Education Archeology Department,Pune, Maharashtra)**



**Work carried out at the excavation site**